राष्ट्रीय आरोग्य अभियान,
आरोग्य विभाग जिल्हा परिषद, ,धाराशिव
Email : dhoosmanabad@gmail.com

जा.क्रं./जिपउ/आवि/NHM/DPMU/ ०१३ /२०२४ दिनांक - २३ / १२ /२०२४

**प्रति,**

१. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, ,धाराशिव
२. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि) जिल्हा परिषद ,धाराशिव

**विषय :-_राष्ट्रीय आरोग्य अभियान व राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत योग शिक्षक यांची निवड करणेसाठी थेट मुलाखत सुचना प्रसिध्द करणे बाबत...**

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत योग शिक्षक यांची निवड करणेसाठी थेट मुलाखत आयोजीत करण्यात आली आहे. याबाबतची सुचना आपले कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी सोबत देण्यात येत आहे.करीता सदरील सुचना www.dharashiv.maharashtra.gov.in व www.zposmanabad.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. हि विनंती.

**सोबत :- थेट मुलाखत सुचना**

(डॉ. एस.एल.हरिदास)
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद ,धाराशिव**



Scanned with OKEN Scanner

आरोग्य विभाग जिल्हा परिषद धाराशिव
राष्ट्रीय आरोग्य अभियान

NHM

# थेट मुलाखत (Walk in Interview)

## पदाचे नाव :- योग शिक्षक (योग सत्रनिहाय)

राष्ट्रीय आरोग्य अभियान,आरोग्य विभाग जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत जिल्ह्यातील आरोग्यवर्धिनी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र साप्ताहिक योग सत्र प्रति योग सत्र-५०० रु. प्रमाणे घेण्यासाठी (मानधन तत्वावरील योग शिक्षक) तालुका निहाय रिक्त पदांची संख्या-३८ (भुम-०४,धाराशिव-०९,कळंब-०३,लोहारा-०५,उमरगा-०६,परंडा-०४,तुळजापूर-०६, वाशी-१) व राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत आयुष आरोग्य वर्धिनी केंद्र स्तरावर प्रति योग सत्र-२५० रु.प्रमाणे योग सत्र घेण्यासाठी (तालुका निहाय रिक्त पदांची संख्या-०२ कळंब-०१,तुळजापूर-०१) आहे.या मानधन तत्वावरील योग शिक्षक पदासाठी थेट मुलाखत दि. ३१ /१२ /२०२४ रोजी आयोजीत करण्यात आली आहे. यामध्ये सकाळी १०.०० ते दु.०१.०० या वेळेत उपस्थित राहून कागदपत्र तपासणी केली जाणार आहे.

तरी इच्छुक योग शिक्षकांनी आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह मुलाखतीस वेळेवर उपस्थित रहावे. अधिक माहितीसाठी व मार्गदर्शक सुचनांसाठी dharashiv.maharashtra.gov.in व www.zposmanabad.gov.in या संकतेस्थळावरुन माहिती घ्यावी.

**आवश्यक कागदपत्र**:- अर्ज, सर्व शैक्षणिक कागदपत्र ,मान्यता प्राप्त विद्यापीठ/योग संस्थेचे योग पदवी/पदविका प्रमाणपत्र, शासकिय संस्थेमध्ये योग घेण्याचा अनुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र

**मुलाखत /कागदपत्र पडताळणीचे ठिकाण** :- राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय रुम नं. २१८, दुसरा मजला जिल्हा परिषद धाराशिव.

(डॉ. एस एल हरिदास)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद ,धाराशिव

Scanned with OKEN Scanner

## राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा परिषद, धाराशिव
# योग शिक्षक (योग सत्रनिहाय) या पदाची
# थेट मुलाखत सन २०२४-२५

आरोग्यवर्धिनी कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील आरोग्यवर्धिनी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र या ठिकाणी साप्ताहीक व सत्रनिहाय योग सत्र घेण्यासाठी योग शिक्षक यांची निवड करणेसाठी थेट मुलाखत दि. ३१ /१२ /२०२४ रोजी सकाळी १०.०० ते दु.०१.०० या वेळेत राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय रुम नं.२१८, दुसरा मजला जिल्हा परिषद धाराशिव येथे आयोजीत करण्यात आली आहे. योग शिक्षकांची खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन निवड करण्यात येणार आहे.

**अटी व शर्ती :-**

१. आरोग्यवर्धिनी कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील आरोग्यवर्धिनी प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्यवर्धिनी उपकेंद्र व आयुष आरोग्यवर्धिनी केंद्र स्तरावर योग सत्र आयोजीत करावयाचे आहेत.योग शिक्षक यांना योग सत्र घेण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान रु. ५००/- प्रति योग सत्र प्रति आठवडा प्रति आरोग्य संस्था व राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत २५०/- प्रति योग सत्र (कमाल ३२ योग सत्र प्रति महिना प्रति आयुष आरोग्यवर्धिनी केंद्र) याप्रमाणे मानधन देण्यात येईल. याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकाचे प्रवास भत्ता, इंधन खर्च, दैनिक भत्ता देय असणार नाही.

२. राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये योग शिक्षक प्रति दिन जास्तीत जास्त दोन आरोग्य संस्थेच्या ठिकाणी योग सत्र घेऊ शकतात. यापेक्षा जास्त योग सत्र घेता येणार नाहीत जास्तीचे योग सत्र घेतल्यास सदर जास्तीचे योग सत्राचे मानधन देय असणार नाही.

३. योग शिक्षक हे पद राज्य शासनाचे नियमित सेवेतील पद नसुन निव्वळ सत्रनिहाय मानधनावरील असल्याने सदर पदावर कायमपणाचा हक्क असणार नाही. कायम करणेबाबत कोणत्याही मा. न्यायालयात दाद मागता येणार नाही. तसेच शासनाचे सेवा नियम लागु राहणार नाहीत.

४. सोबत देण्यात आलेल्या मान्यताप्राप्त विद्यापीठ/संस्थेमधुन योग पदवी/पदविका उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**आवश्यक कागदपत्र :-**

१. अर्ज
२. सर्व शैक्षणिक कागदपत्र
३. मान्यता प्राप्त विद्यापीठ/योग संस्थेचे योग पदवी/पदविका उत्तीर्ण झालेबाबतचे प्रमाणपत्र
४. अनुभव प्रमाणपत्र (असल्यास)

**मुलाखत /कागदपत्र पडताळणीचे ठिकाण :-**

राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, रुम नं.२१८, दुसरा मजला जिल्हा परिषद,धाराशिव

(डॉ. एस.एल हरिदास)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद ,धाराशिव

Scanned with OKEN Scanner

# योग प्रशिक्षक (सत्र निहाय मानधनावर) अर्ज

दि /१२/२०२४

**प्रति,**

मा.जिल्हा आरोग्य आधिकारी
जिल्हा परिषद,धाराशिव

**विषय :- योग प्रशिक्षक (सत्र निहाय मानधनावर) बाबत.**

महोदय,

राष्ट्रीय आरोग्य अभियान,आरोग्य विभाग जिल्हा परिषद ,धाराशिव अंतर्गत जिल्हयातील आरोग्यवर्धिनी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र या ठिकाणी साप्ताहीक योग सत्र घेण्यासाठी आणि राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत आयुष आरोग्य वर्धिनी केंद येथे योग शिक्षक (मानधनतत्वावर)यांची निवड करणेसाठी थेट मुलाखतीसाठी मी (नाव) ......................................................................................................................................

धाराशिव जिल्हयात योग सत्रामध्ये योग शिक्षक (मानधनतत्वावर) म्हणून काम करण्यास तयार आहे. मी (गावाचे नाव) ................येथे गेली (अनुभव)........... वर्ष योग प्रशिक्षण देत आहे.

मी आपल्या धाराशिव जिल्हयातील आरोग्यवर्धिनी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र आणि आयुष आरोग्य वर्धिनी केंद्र मध्ये योग प्रशिक्षण विषयात प्रशिक्षक म्हणून सत्र निहाय मंजूर मानधनावर काम करण्यास तयार आहे.सोबत माझ्या शैक्षणिक आर्हतेबावतचे आणि योग पदविका प्रमाणपत्र सोबत जोडलेले आहेत.

तरी मला योग शिक्षक (मानधनतत्वावर) म्हणून काम करणेस संधी मिळावी.

ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

सेबत:-
शैक्षणिक अर्हतेचे कागदपत्रे

नाव:-

मोबाईल क्र.:-

मेल आयडी :-

पत्ता :-

Scanned with OKEN Scanner